# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र

## बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००२६५५**

**अपिलार्थी श्रीमती सुजाता सचिन काटकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक अधिकारी (मुंबई-४)**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई-४
कल्पतरु पॉईंट, दुसरा मजला, शिव माटुंगा स्किम रोड क्र.०८,
शिव सर्कल समोर, शिव (पूर्व), मुंबई - ४०००२२

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्रादेशिक अधिकारी**
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई-४
कल्पतरु पॉईंट, दुसरा मजला, शिव माटुंगा स्किम रोड क्र.०८,
सिने प्लॅनेट सिनेमा समोर, शिव सर्कल समोर, शिव (पूर्व), मुंबई - ४०००२२

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १०.१२.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १०.०५.२०२४ | १४.०६.२०२४ | १०.०६.२०२४ | ०४.०७.२०२४ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २९.०८.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि.०४.०७.२०२४ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. १०.०५.२०२३ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"मुद्दा क्र. (१) SRO Mum- ४ यांच्या हद्दीतील आर. एम. सी. प्लांट्स उद्योगांची नावे, पत्ते, consent date (संमती पत्रे दिनांक), validity consent date (संमती पत्रांची अंतिम दिनांक), captive and commercial उद्योग यांसह माहिती द्यावी. मुद्दा क्र. (२) आर. एम. सी. प्लांट्स उद्योग चालकांची बृ.मुं.म. पा. फायर ब्रिगेड व इतर संबंधित विभागांची पुर्व परवानगी प्राप्ती नंतर म. प्र. नि. मंडळाने संमती पत्रे जारी केली असल्यास माहिती द्यावी. मुद्दा क्र. (३) २००० ते २०२४ पर्यंत आर. एम. सी. प्लांट बंद करण्यात आल्याची यादी यादी व २००० ते २०२४ पर्यंत अस्तित्वात असल्याची आर. एम. सी. प्लांट्स उद्योगांची माहिती द्यावी."*

..२/-

३. जन माहिती अधिकारी यांनी उत्तर न दिल्याने अपिलार्थीनी दि. १०.०६.२०२४ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०७.२०२४ रोजी जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले की, उप प्रादेशिक कार्यालय, मुंबई- ४ यांच्याकडे उपलब्ध असलेली आर. एम. सी उद्योगांची सुची व संमतीपत्रांच्या प्रती आदेश पारित झालेल्या दिवसांपासुन १५ दिवसांच्या आत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. सबब, अर्जदाराने दाखल केलेला अपिल अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

४. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी उपस्थित असून त्यांनी त्यांचे लेखी आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, अपिलार्थीनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असून अनेक नस्ती/ विषयांच्या संबंधीत दिसून आल्याने तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी दि.१४.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थींना सामान्य प्रशासन विभाग यांचे दि. १६.०१.२०१२ रोजीची अधिसूचना नमुद करुन कळविलेले होते. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानंतर अपिलार्थींना माहिती देण्यात आल्याची स्पष्टता दिसून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असेही सादर केले की, सदर प्रकरणाच्या माहिती अर्जाच्या विषयावर अपिलार्थींना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तरीही अपिलार्थींना पुन्हा माहिती देण्यास ते तयार आहेत.

५. जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेशानुसार अपिलार्थींना अपेक्षित असलेली माहिती अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai सत्यमेव जयते

11-12-2025

**मुंबई**
**दिनांक : ११.१२.२०२५**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**